# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## !!प्रकटन!!

विषय :- फेब्रुवारी – मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा फेब्रुवारी – मार्च २०२६ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व माध्यमिक शाळांना फेब्रुवारी – मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर मंगळवार दि. २० जानेवारी, २०२६ पासून Admit Card या Link व्दारे download करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. फेब्रुवारी-मार्च २०२६ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यक्षेतील सर्व माध्यमिक शाळांनी इ.१० वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२. प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.

३. ज्या आवेदनपत्रांना "Paid" असे Status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे "Paid Status Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

४. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No. विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे "Extra Seat No Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

५. Download केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/ जन्मतारीख / जन्मठिकाण अशा दुरूस्त्या असल्यास सदर दुरूस्त्या Online पध्दतीने करावयाच्या असून त्याकरीता Application Correction ही Link उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहित दुरूस्ती शुल्क भरून दुरूस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर "Correction Admit Card " या Link व्दारे सुधारीत Admit Card उपलब्ध होतील. विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.

६. ज्या आवेदनपत्रांना "Paid " असे Status प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update होवून "Late Paid Status Admit Card" या Option व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे.

८. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित माध्यमिक शाळांनी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

तरी फेब्रुवारी – मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक तसेच सर्व माध्यमिक शाळा यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

दिनांक : १६/०१/२०२६

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ४.

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/
दिनांक :-

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय:- फेब्रुवारी-मार्च 2026 च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)
संदर्भ:- क्र.रा.मं./परीक्षा-7/165, दि.16.01.2026 चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षा फेब्रु/मार्च - 2026 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांबाबत उपरोक्त प्रकटनानुसार सर्व सुचनांची नोंद घेऊन कार्यवाही करावी. तसेच No Candidate करावयाच्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे संबंधित विद्यार्थ्यांना वितरीत न करता ती मंडळ कार्यालयात जमा करावीत. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास मंडळ कार्यालयाशी संपर्क साधावा.

**तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रामध्ये नांव, आईचे नांव व इतर दुरुस्त्या दि.20.02.2026 ते दि.31.03.2026 पर्यंत ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याच्या आहेत.**

तथापि, विषय / माध्यम अथवा विषय कोड यामध्ये दुरुस्ती असल्यास सोबतच्या प्रपत्र नमुन्याप्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव प्रवेशपत्राच्या तीन प्रतींसह प्रती दुरुस्ती रु.200/- शुल्क रोखीने भरुन मंडळ कार्यालयात समक्ष सादर करावा, जेणेकरुन दुरुस्ती प्रक्रिया वेळेत होईल. दुरुस्ती प्रस्ताव मंडळ कार्यालयास वेळेत प्राप्त न झाल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस शाळा जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

(बसवेश्वर किल्लेदार)
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

# प्रवेशपत्रिकेतील / शाळा यादीतील चुकीच्या दुरुस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र

To be submitted before Examination

प्रपत्र परीक्षापूर्व दोन दिवसापर्यंत समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

शाळा क्रमांक : | | | | | | |

## S. S. C. Examination of March / October - 201

**Proforma Indicating Errors In the Seat No. Wise School List of Candidates.**

| No.<br>क्र. | Seat No.<br>बैठक क्रमांक | Name of the Candidate<br>विद्यार्थ्याचे नांव | Original Position in the School List<br>शाळा यादीतील नोंद | Correct position As per the School Record<br>शाळा दप्तराप्रमाणे आवश्यक दुरुस्ती | Application Form No.<br>आवेदनपत्र क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

प्रपत्र इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.

स्थळ :

दिनांक :

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका